SANT GADGE BABA AMRAVATI UNIVERSITY GAZETTE

Official Publication of Sant Gadge Baba Amravati University

PART- TWO

गुरुवार, दिनांक १८ डिसेंबर, २०२५

अधिसूचना

क्रमांक : २३९/२०२५ **दिनांक : १८/१२/२०२५**

विषय : सन २०२५-२०२६ चे डॉ. जे.पी. नाईक आदर्श राज्य शिक्षक पुरस्कार प्रदान करणेबाबत.

संदर्भ : १) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक - पुरस्कार-२०२५ /CN-१३१०६४२/प्र.क्र. ८९/ समन्वय, दि.०५ सप्टेंबर, २०२५

२) शासन परिपत्रक क्रमांक - पुरस्कार-२०२५ /CN-१३१०६४२/प्र.क्र. ८९/ समन्वय, दि.१६/१०/२०२५

३) क्र. उशिस-२०२५-शिक्षक पुरस्कार/प्रशा-३/ई-२००२२८६ दिनांक १७.१०.२०२५

ज्याअर्थी उपरोक्त विषयांस अनुसरून शासनाने संदर्भांकित आदर्श राज्य शिक्षक पुरस्काराचे नांव बदलवून सदर पुरस्काराचे नांव डॉ. जे.पी. नाईक आदर्श राज्य शिक्षक पुरस्कार असे संबोधित केलेले आहे व दि. २६ डिसेंबर, २०१२ च्या शासन निर्णयातील कार्यपध्दतीमध्ये सुधारणा केली आहे.

आणि

ज्याअर्थी सन २०२५-२६ पासून "डॉ. जे.पी. नाईक आदर्श राज्य शिक्षक पुरस्कार" प्रदान करण्याकरीता निवड प्रक्रीया कार्यक्रम राबवावयाचा आहे आणि यासाठी दि. १ जानेवारी पर्यंत वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करावयाची आहे.

त्याअर्थी सर्व संबंधितांना व इच्छुक असलेल्या सर्व संबंधितांना अधिसूचित करण्यात येते की त्यांनी विद्यापीठाची या संबंधात जाहिरात प्रसिध्द झाल्यानंतर व त्यामधून दर्शविलेल्या अंतिम तारखेच्या आत उपरोक्त नमूद शासन निर्णय व परिपत्रकातील सर्व अटी व शर्तींची पूर्तता करून आपले अर्ज १६ प्रतींमध्ये Spiral Binding स्वरूपात विद्यापीठाला सादर करावे. याबाबतची मानक कार्यपध्दती (SoP) सोबत जोडण्यात येत आहे.

संदर्भांकित क्रमांक १,२ व ३ ची प्रत तसेच मानक कार्यपध्दती (SoP) विद्यापीठाच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे.

आदेशान्वये

स्वा/-
कुलसचिव
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

डॉ. जे.पी. नाईक आदर्श राज्य शिक्षक / प्राचार्य पुरस्कार करिता अर्ज सादर करित असतांना अवलंबवावयाची मानक कार्यपद्धती (SoP)

संदर्भ : (१) उच्च व तंत्रशिक्षण विभाग, शासन निर्णय क्र. पुरस्कार-२०२५/CN-१३१०६४२/प्र.क्र.८९/समन्वय, दि.५.९.२०२५.

(२) शासन परिपत्रक क्र.पुरस्कार-२०२५/CN-१३१०६४२/प्र.क्र.८९/समन्वय,दि.१६.१०.२०१५.

(३) क्र.उशिस-२०२५-शिक्षक पुरस्कार/प्रशा-३/ई-२००२२८६, दि.१७.१०.२०२५.

डॉ. जे.पी. नाईक आदर्श राज्य शिक्षक / प्राचार्य पुरस्कार करिता अर्ज सादर करणे व त्यांची छाननी प्रक्रिया सुलभ करण्याच्या दृष्टीने, हे SoP देण्यात येत आहे. अर्जकर्त्यांनी संदर्भीत शासन निर्णय पूर्णपणे वाचुन त्यानुसार दस्तावेज सादर करावेत. अंतीम निर्णय सर्व शासन निर्णयाच्या अधिन राहूनच घेण्यात येतील, याची नोंद घ्यावी.

शिक्षकांकरिता

(अ) संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयातील विविध विषयाच्या मान्यताप्राप्त शिक्षकांना या पुरस्काराकरिता अर्ज सादर करता येईल.

(ब) विद्यापीठाद्वारे राज्य शिक्षक पुरस्काराचा अर्ज मागविण्यासाठी विद्यापीठाच्या कुलसचिव मार्फत विविध वर्तमानपत्रामध्ये जाहिराती दिल्या जातील. सदर जाहिराती शासन निर्णयानुसार १ जानेवारी पर्यंत वर्तमानपत्रामध्ये प्रकाशीत केल्या जाईल. सदर जाहिरातीच्या अनुषंगाने सर्व संलग्नित महाविद्यालयातील शिक्षकांकडून या पुरस्काराकरिता अर्ज/प्रस्ताव दि.३१ जानेवारीपर्यंत विद्यापीठामध्ये स्विकारल्या जातील. सदर पुरस्काराकरिता प्राथमिक अटी खालीलप्रमाणे निर्धारित करण्यात येत आहे.

(१) शासनाने विहीत केलेल्या सेवाप्रवेश नियमानुसार नियुक्त झालेले शिक्षकच सदर पुरस्काराकरिता अर्ज करु शकतात. (**परिशिष्ट-क**)

(२) शिक्षकाने नियमित वर्ग अध्यापनाचे कार्य केले असल्याबाबतचे व अध्यापना व्यतिरिक्त अन्य क्षेत्रात प्रतिनियुक्तीवर गेलेले नसल्याबाबतचे प्रमाणपत्र संबंधित महाविद्यालयाचे प्राचार्य प्रमाणित करुन देतील. सदर प्रमाणपत्र अर्जासोबत लावणे अनिवार्य राहील. (**परिशिष्ट-ख**)

(३) अर्ज सादर करणाऱ्या प्रत्येक शिक्षकांची कमीत कमी १५ वर्षे अध्यापन सेवा केलेली असावी. याबाबतचे प्रमाणपत्र संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी प्रमाणित केले असावे. सदर प्रमाणपत्र अर्जासोबत लावणे अनिवार्य राहील. (**परिशिष्ट-ग**)

(४) डॉ. जे.पी. नाईक आदर्श राज्य शिक्षक पुरस्कार प्राप्त शिक्षक, पुनःश्च अशा पुरस्कारासाठी पात्र राहणार नाही. याबाबतचे प्रमाणपत्र संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी प्रमाणित केले असावे. सदर प्रमाणपत्र अर्जासोबत लावणे अनिवार्य राहील. (**परिशिष्ट-घ**)

(५) सदर पुरस्काराकरिता अर्ज सादर करणारा शिक्षक विभागीय चौकशीत दोषी आढळलेला नसावा, तसेच विभागीय चौकशी त्याच्या संदर्भात प्रलंबित नसावी. याबाबतचे प्रमाणपत्र संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी प्रमाणित केले असावे. सदर प्रमाणपत्र अर्जासोबत लावणे अनिवार्य राहील. (**परिशिष्ट-च**)

(६) सदर पुरस्काराकरिता अर्ज सादर करणाऱ्या शिक्षकांविरुद्ध फौजदारी कारवाईत शिक्षा झालेली नाही. तसेच पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल नाही, असे प्रतिज्ञापत्र संबंधित शिक्षकाने अर्जासोबत सादर करणे अनिवार्य राहील. (**परिशिष्ट-छ**)

(७) सदर पुरस्काराकरिता अर्ज सादर करणारा शिक्षक खाजगी शिकवणी करीत नाही, असे प्रतिज्ञापत्र संबंधित शिक्षकाने अर्जासोबत सादर करणे अनिवार्य राहील. (**परिशिष्ट-ज**)

(८) सदर पुरस्काराकरिता अर्ज एकुण १६ प्रतीमध्ये (परिशिष्ट सहीत) सादर करावा.

(९) अर्जासोबतचे परिशिष्ट अनुक्रमीत असावेत. संशोधन पेपर राष्ट्रीय,आंतरराष्ट्रीय स्तर,Journal paper, पुस्तक ई.स्वतंत्र वर्गीकृत करण्यात यावे. तसेच प्रत्येक वर्गवारीच्या दस्तावेजांची अनुक्रमणिका वेगळी लावावी.

प्राचार्यांकरिता : खाली नमुद सर्व दस्तावेज संस्थेचे अध्यक्ष/सचिव यांनी प्रमाणित केलेले असावेत.

(१) महाविद्यालयामध्ये प्राचार्यांच्या कालावधीत किती नवीन अभ्यासक्रम /विषय सुरु करण्यात आले? (**परिशिष्ट-१**)

(२) महाविद्यालयामध्ये प्राचार्यांच्या कालावधीत महाविद्यालयातील किती अध्यापकांना/विद्यार्थ्यांना पीएच.डी. साठी प्रोत्साहीत करण्यात आले? (**परिशिष्ट-२**)

(३) महाविद्यालयामध्ये प्राचार्यांच्या कालावधीत महाविद्यालयामार्फत राज्य/राष्ट्रीय/आंतरराष्ट्रीय स्तरावरील किती शैक्षणिक कार्यशाळा व चर्चासत्र आयोजित करण्यात आले? (**परिशिष्ट-३**)

(४) महाविद्यालयामध्ये प्राचार्यांच्या कालावधीत महाविद्यालयामार्फत विद्यार्थ्यांसाठी अभ्यासक्रमा व्यतिरिक्त किती इतर उपक्रम राबविण्यात आले? (**परिशिष्ट-४**)

(५) महाविद्यालयामध्ये प्राचार्यांच्या कालावधीत महाविद्यालयास राज्यस्तर/राष्ट्रीय स्तरावरील किती पारितोषीके प्राप्त झाली? (**परिशिष्ट-५**)

(६) महाविद्यालयामध्ये प्राचार्यांच्या कालावधीत विविध फंडिंग एजन्सी मार्फत देण्यात येणाऱ्या संशोधन अनुदान अंतर्गत महाविद्यालयामार्फत संशोधनाचे मोठे (Major) व लघु (Minor) स्वरुपाचे किती प्रकल्प तयार करण्यात आले आहेत?/ पूर्ण झाले आहेत/कार्यान्वित आहेत? (**परिशिष्ट-६**)

(७) महाविद्यालयामध्ये प्राचार्यांच्या कालावधीत महाविद्यालयाचा शैक्षणिक दर्जा उंचावण्यासाठी लॅबोरेटीज,इंडस्ट्रीज, एन.जी.सी. व सामाजिक आणि शैक्षणिक संस्था व इतर यांच्यातील समन्वय rLinkages साधण्यात आला आहे काय? (**परिशिष्ट-७**)

(८) महाविद्यालयामध्ये प्राचार्यांच्या कालावधीत महाविद्यालयामार्फत उच्च शिक्षण सुधारण्याबाबत कोणते नावीण्यपूर्ण उपक्रम राबविले? अभ्यासक्रमात कमकुवत विद्यार्थ्यांसाठी विशेष योजनेबाबत प्रयत्न. (**परिशिष्ट-८**)

(९) महाविद्यालयामध्ये प्राचार्यांच्या कालावधीत महाविद्यालयासाठी विद्यापीठ अनुदान आयोग (युजीसी), जिल्हा नियोजन व विकास समिती (डीपीडीसी) व इतर संस्थांकडून (शासकीय व अशासकीय) विविध योजनांकरिता किती अनुदान प्राप्त झाले? (**परिशिष्ट-९**)

(१०) महाविद्यालयामध्ये प्राचार्यांच्या कालावधीत महाविद्यालयामार्फत मागास, अल्पसंख्यांक व गरजू विद्यार्थ्यांसाठी कोणत्या विशेष योजना राबविण्यात आल्या? (**परिशिष्ट-१०**)

(११) महाविद्यालयामध्ये प्राचार्यांच्या कालावधीत प्रत्येक शैक्षणिक वर्षात संशोधन मार्गदर्शकांच्या (guide) माध्यमातून विविध विषयातील किती संशोधक शिष्यवृत्तीधारक (Research Scholar) तयार केले? (**परिशिष्ट-११**)

(१२) महाविद्यालयामध्ये प्राचार्यांच्या कालावधीत महाविद्यालयीन ग्रंथ खरेदीचा तपशील. (**परिशिष्ट-१२**)

(१३) महाविद्यालयामध्ये प्राचार्यांच्या कालावधीत राष्ट्रीय / आंतरराष्ट्रीय स्तरावरील विविध विषयांवरील परिषदांमध्ये शैक्षणिक वर्षात भाग घेतला आहे/नाही, याचा तपशील. (**परिशिष्ट-१३**)

(१४) महाविद्यालयामध्ये प्राचार्यांच्या कालावधीत मागील तीन वर्षातील विद्यार्थ्यांचे उत्तीर्णतेचे प्रमाण (वर्षनिहाय निकाल ८०% पेक्षा जास्त असणे आवश्यक) (**परिशिष्ट-१४**)

(१५) नॅक मुल्यांकन व पुनर्मुल्यांकन करण्याबाबत केलेली कार्यवाही. (**परिशिष्ट-१५**)

(१६) राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अनुषंगाने केलेली विशेष कार्यवाही. (**परिशिष्ट-१६**)

(१७) प्राचार्य म्हणुन मागील तीन वर्षातील वर्षनिहाय एपीआय (Academic Research Score) गुण (किमान ११०) सदरील एपीआय विद्यापीठाने प्रमाणित केलेला असणे आवश्यक आहे. (**परिशिष्ट-१७**)

(१८) सदर पुरस्काकरिता अर्ज एकुण १६ प्रतीमध्ये (परिशिष्ट सहीत) सादर करावा.

परिशिष्ट-क

शासनाने विहीत केलेल्या सेवाप्रवेश नियमानुसार नियुक्त झालेले शिक्षक असल्याबाबतचे प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, श्री / श्रीमती / डॉ. ..... हे / ह्या ..... पासुन ..... या महाविद्यालयामध्ये ..... या विषयाचे शिक्षक असुन .....या पदावर कार्यरत आहेत. शासनाने विहीत केलेल्या सेवाप्रवेश नियमानुसार सदर शिक्षकांची नियुक्ती झालेली आहे. सदर अर्ज सादर करणाऱ्या शिक्षकांनी विनंती केल्यानुसार डॉ. जे.पी. नाईक आदर्श राज्य शिक्षक पुरस्काराकरिता हे प्रमाणपत्र उपरोक्त शिक्षकांना देण्यात येत आहे.

प्राचार्य

परिशिष्ट-ख

नियमित वर्ग अध्यापनाचे कार्य केले असल्याबाबतचे प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, श्री / श्रीमती / डॉ. ..... हे / ह्या ..... पासुन ..... या महाविद्यालयामध्ये ..... या विषयाचे शिक्षक असुन ..... या पदावर कार्यरत आहेत. सदर शिक्षक या महाविद्यालयामध्ये नियमित वर्ग अध्यापन कार्य करित आहे. अध्यापनाव्यतिरिक्त अन्य क्षेत्रात प्रतिनियुक्तीवर गेलेले प्रतिनियुक्तीवर आहेत असे शिक्षक पुरस्कारासाठी अपात्र राहतील. सदर अर्ज सादर करणाऱ्या शिक्षकांनी विनंती केल्यानुसार डॉ. जे.पी. नाईक आदर्श राज्य शिक्षक पुरस्काराकरिता सदर प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

प्राचार्य

परिशिष्ट-ग

कमीत कमी १५ वर्षे अध्यापन सेवा केली असल्याबाबतचे प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, श्री / श्रीमती / डॉ. ..... हे / ह्या ..... पासुन ..... या महाविद्यालयामध्ये ..... या विषयाचे शिक्षक असुन ..... या पदावर कार्यरत आहेत. त्यांचा या महाविद्यालयामध्ये अध्यापन कार्य करित असल्याचा महाविद्यालयामध्ये उपलब्ध दस्तऐवजानुसार ..... वर्षे ..... महीने ..... दिवस अनुभव आहे. डॉ. जे.पी. नाईक आदर्श राज्य शिक्षक पुरस्काराकरिता सदर अर्ज सादर करणाऱ्या शिक्षकांनी विनंती केल्यानुसार सदर प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

प्राचार्य

परिशिष्ट-घ

डॉ. जे.पी.नाईक आदर्श राज्य शिक्षक पुरस्कार प्राप्त न केल्याबाबतचे प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, श्री / श्रीमती / डॉ. ..... हे / ह्या ..... पासुन ..... या महाविद्यालयामध्ये ..... या विषयाचे शिक्षक असुन ..... या पदावर कार्यरत आहेत. त्यांना डॉ. जे.पी. नाईक आदर्श राज्य शिक्षक पुरस्कार यापूर्वी प्राप्त झालेला नाही. त्याकरिता सदर प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

प्राचार्य

परिशिष्ट-च

विभागीय चौकशीत दोषी न आढळले, विभागीय चौकशी प्रलंबित नसल्याबाबतचे प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, श्री / श्रीमती / डॉ. ..... हे / ह्या ..... पासुन ..... या महाविद्यालयामध्ये ..... या विषयाचे शिक्षक असुन ..... या पदावर कार्यरत आहेत. अर्ज सादर करणारे शिक्षक विभागीय चौकशीत दोषी आढळलेले नसुन त्यांचेविरुद्ध विभागीय चौकशी प्रलंबित नाही. करीता हे प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

प्राचार्य

परिशिष्ट-छ

फौजदारी कारवाईत शिक्षा झाली नसल्याबाबतचे प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, मी श्री / श्रीमती / डॉ. ..... हे / ह्या ..... पासुन ..... या महाविद्यालयामध्ये ..... या विषयाचे शिक्षक असुन ..... या पदावर कार्यरत आहेत. मला कोणत्याही फौजदारी कारवाईत शिक्षा झाली नसुन पोलीस स्टेशनमध्ये माझे विरुद्ध कुठलाही गुन्हा दाखल झालेला नाही. त्याकरिता सदर प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

शिक्षक / शिक्षिकेचे नाव व स्वाक्षरी

परिशिष्ट-ज

खाजगी शिकवणी करीत नसल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र

मी श्री / श्रीमती / डॉ. ..... या ..... पासुन ..... या महाविद्यालयामध्ये ..... या विषयाचा शिक्षक कार्यरत असुन मी माझ्या व्यक्तिगत जीवनामध्ये खाजगी शिकवणी घेत नसुन वेतना व्यतिरिक्त दुसरे कुठलेही आर्थिक उत्पन्न खाजगी शिकवणीच्या माध्यमातुन मला प्राप्त झालेले नाही आहे. करिता सदर प्रतिज्ञापत्र देत आहे.

(शिक्षक / शिक्षिकेचे नाव व स्वाक्षरी)

परिशिष्ट-झ

अध्यापन करित असलेल्या विषयामध्ये विद्यार्थ्यांचे ८०% पेक्षा जास्त विद्यार्थी उत्तीर्ण होत असल्याबाबतचे प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, श्री / श्रीमती / डॉ. ..... या दि. ..... पासुन ..... या महाविद्यालयामध्ये ..... शिक्षक पदावर कार्यरत असुन, त्यांनी अध्यापन केलेल्या विषयातील विद्यार्थ्यांच्या उत्तीर्णतेचे मागील ५ वर्षाचे प्रमाण खालीलप्रमाणे आहे.

तक्ता

अ.क्र.	विषय	शैक्षणिक वर्ष	सत्र	एकुण प्रवेशित विद्यार्थी	उत्तीर्ण विद्यार्थी	उत्तीर्ण विद्यार्थी टक्केवारी
१.						
२.						
३.						
४.						
५.						

परिशिष्ट-१

प्राचार्यांच्या कालावधीत किती नवीन अभ्यासक्रम/विषय सुरु करण्यात आले त्याबाबतचे प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, श्री / श्रीमती / डॉ. ..... हे / ह्या दि..... पासुन ..... या महाविद्यालयामध्ये प्राचार्य म्हणुन कार्यरत आहेत. या प्राचार्यांच्या कालावधीत आमच्या महाविद्यालयामध्ये ..... एवढे नवीन अभ्यासक्रम / विषय सुरु करण्यात आले. करिता सदर प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

संस्था अध्यक्ष / सचिव

परिशिष्ट-२

प्राचार्यांच्या कालावधीत महाविद्यालयातील अध्यापकांना / विद्यार्थ्यांना पीएच.डी. करिता प्रोत्साहीत करण्यात आले असल्याबाबतचे प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, श्री / श्रीमती / डॉ. ..... हे / ह्या ..... पासुन ..... या महाविद्यालयामध्ये प्राचार्य म्हणुन कार्यरत आहेत. सदर प्राचार्यांच्या कालावधीत या महाविद्यालयातील ..... अध्यापक ..... विद्यार्थ्यांना पीएच.डी. साठी प्रोत्साहीत करण्यात आले. करिता सदर प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

संस्था अध्यक्ष / सचिव

परिशिष्ट-३

प्राचार्यांच्या कालावधीत महाविद्यालयामार्फत राज्य/राष्ट्रीय/आंतरराष्ट्रीय स्तरावरील शैक्षणिक कार्यशाळा व चर्चासत्र आयोजित करण्यात आले त्याबाबतचे प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, श्री / श्रीमती / डॉ. ..... हे / ह्या ..... पासुन ..... या महाविद्यालयामध्ये प्राचार्य म्हणुन कार्यरत आहेत. या प्राचार्यांच्या कालावधीत आमच्या महाविद्यालयामार्फत ..... एवढे राज्य / राष्ट्रीय / आंतरराष्ट्रीय स्तरावरील शैक्षणिक कार्यशाळा व चर्चासत्रांचे आयोजन करण्यात आले आहे. करिता सदर प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

संस्था अध्यक्ष / सचिव

परिशिष्ट-४

प्राचार्यांच्या कालावधीत महाविद्यालयामार्फत विद्यार्थ्यांसाठी अभ्यासक्रमा व्यतिरिक्त इतर अभ्यासक्रम राबविण्यात आले असल्याबाबतचे प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, श्री / श्रीमती / डॉ. ..... हे / ह्या दि..... पासुन ..... या महाविद्यालयामध्ये प्राचार्य म्हणुन कार्यरत आहेत. सदर प्राचार्यांच्या कालावधीत या महाविद्यालयामार्फत विद्यार्थ्यांसाठी अभ्यासक्रमा व्यतिरिक्त ..... एवढे इतर अभ्यासक्रम राबविण्यात आलेत. करिता सदर प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

संस्था अध्यक्ष / सचिव

परिशिष्ट-५

प्राचार्यांच्या कालावधीत महाविद्यालयास राज्यस्तर / राष्ट्रीय स्तरावरील पारितोषिके प्राप्त झाले असल्याबाबतचे प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, श्री / श्रीमती / डॉ. ..... हे / ह्या दि..... पासुन ..... या महाविद्यालयामध्ये प्राचार्य म्हणुन कार्यरत आहेत. सदर प्राचार्यांच्या कालावधीत या महाविद्यालयास राज्यस्तर / राष्ट्रीय स्तरावरील ..... पारितोषिके प्राप्त झाली आहेत. करिता सदर प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

संस्था अध्यक्ष / सचिव

परिशिष्ट-६

प्राचार्यांच्या कालावधीत विविध फंडींग एजंसीमार्फत महाविद्यालयास मोठे व लघु प्रकल्प प्राप्त झाले असल्याबाबतचे प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, श्री / श्रीमती / डॉ. ..... हे / ह्या दि..... पासुन ..... या महाविद्यालयामध्ये प्राचार्य म्हणुन कार्यरत आहेत. सदर प्राचार्यांच्या कालावधीत या महाविद्यालयास विविध फंडींग एजंसी मार्फत संशोधनाचे ..... मोठे व ..... लघु प्रकल्प प्राप्त झाली आहेत. त्यापैकी ..... प्रकल्प तयार करण्यात आले आहेत, ... पूर्ण झाले आहेत व ..... कार्यान्वित झाले आहेत. करिता सदर प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

संस्था अध्यक्ष / सचिव

परिशिष्ट-७

प्राचार्यांच्या कालावधीत महाविद्यालयाचा शैक्षणिक दर्जा उंजावण्यासाठी लॅबोरेटीज, इंडस्ट्रीज, एन.जी.सी. व सामाजिक आणि शैक्षणिक संस्था व इतर यांच्यामध्ये सामंजस्य करार करण्यात आले त्याबाबतचे प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, श्री / श्रीमती / डॉ. ..... हे / ह्या दि..... पासुन ..... या महाविद्यालयामध्ये प्राचार्य म्हणुन कार्यरत आहेत. सदर प्राचार्यांच्या कालावधीत या महाविद्यालयाचा शैक्षणिक दर्जा उंजावण्यासाठी लॅबोरेटीज, इंडस्ट्रीज, एन.जी.सी. व सामाजिक आणि शैक्षणिक संस्था व इतर यांच्यामध्ये ..... सामंजस्य करार करण्यात आले. करिता सदर प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

संस्था अध्यक्ष / सचिव

परिशिष्ट-८

प्राचार्यांच्या कालावधीत उच्च शिक्षण सुधारण्याबाबत नाविण्यपूर्ण उपक्रम राबविणे तसेच कमकुवत विद्यार्थ्यांकरिता विशेष योजना राबविण्याबाबतचे प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, श्री / श्रीमती / डॉ. .....हे / ह्या दि..... पासुन ..... या महाविद्यालयामध्ये प्राचार्य म्हणुन कार्यरत आहेत. सदर प्राचार्यांच्या कालावधीत महाविद्यालयामार्फत उच्च शिक्षण सुधारण्याबाबत ..... नाविण्यपूर्ण उपक्रम राबविले आहेत. तसेच कमकुवत विद्यार्थ्यांकरिता ..... विशेष योजना राबविण्यात आल्यात. करिता सदर प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

संस्था अध्यक्ष / सचिव

परिशिष्ट-९

प्राचार्यांच्या कालावधीत युजीसी, जिल्हा नियोजन व विकास समिती तथा इतर संस्थांकडून विविध योजनांकरिता अनुदान प्राप्त झाल्याबाबतचे प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, श्री / श्रीमती / डॉ. ..... हे / ह्या दि..... पासुन ..... या महाविद्यालयामध्ये प्राचार्य म्हणुन कार्यरत आहेत. सदर प्राचार्यांच्या कालावधीत विद्यापीठ अनुदान आयोग, जिल्हा नियोजन व विकास समिती तथा इतर संस्थांकडून (शासकीय व अशासकीय) विविध योजनांकरिता रु..... एवढे अनुदान प्राप्त झाले आहे. करिता सदर प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

संस्था अध्यक्ष / सचिव

परिशिष्ट-१०

प्राचार्यांच्या कालावधीत मागास, अल्पसंख्यांक व गरजु विद्यार्थ्यांकरिता विशेष योजना राबविण्यात आल्याबाबतचे प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, श्री / श्रीमती / डॉ. ..... हे / ह्या दि..... पासुन ..... या महाविद्यालयामध्ये प्राचार्य म्हणुन कार्यरत आहेत. सदर प्राचार्यांच्या कालावधीत महाविद्यालयामध्ये मागास, अल्पसंख्यांक व गरजु विद्यार्थ्यांकरिता ..... विशेष योजना राबविण्यात आल्यात. करिता सदर प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

संस्था अध्यक्ष / सचिव

परिशिष्ट-११

प्राचार्यांच्या कालावधीत प्रत्येक शैक्षणिक वर्षात संशोधन मार्गदर्शकांच्या माध्यमातुन विविध विषयातील संशोधक शिष्यवृत्तीधारक तयार करण्यात आल्याबाबतचे प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, श्री / श्रीमती / डॉ. ..... हे / ह्या दि..... पासुन ..... या महाविद्यालयामध्ये प्राचार्य म्हणुन कार्यरत आहेत. सदर प्राचार्यांच्या कालावधीत प्रत्येक शैक्षणिक वर्षात संशोधन मार्गदर्शकांच्या (guide) माध्यमातुन विविध विषयातील ..... संशोधक शिष्यवृत्तीधारक (Research Scholar) तयार करण्यात आले. करिता सदर प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

संस्था अध्यक्ष / सचिव

परिशिष्ट-१२

प्राचार्यांच्या कालावधीत महाविद्यालयामध्ये खरेदी करण्यात आलेल्या ग्रंथ खरेदीचा तपशिल असल्याबाबतचे प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, श्री / श्रीमती / डॉ. ..... हे / ह्या दि..... पासुन ..... या महाविद्यालयामध्ये प्राचार्य म्हणुन कार्यरत आहेत. सदर प्राचार्यांच्या कालावधीत या महाविद्यालयामध्ये रु..... एवढी ग्रंथ खरेदी करण्यात आली आहे. करिता सदर प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

संस्था अध्यक्ष / सचिव

परिशिष्ट-१३

प्राचार्यांच्या कालावधीत राष्ट्रीय / आंतरराष्ट्रीय स्तरावरील विविध विषयांवरील परिषदांमध्ये भाग घेतला असल्याबाबतचे प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, श्री / श्रीमती / डॉ. ..... हे / ह्या दि..... पासुन ..... या महाविद्यालयामध्ये प्राचार्य म्हणुन कार्यरत आहेत. सदर प्राचार्यांच्या कालावधीत या महाविद्यालयामध्ये राष्ट्रीय / आंतरराष्ट्रीय स्तरावरील ..... विविध विषयांच्या परिषदांचे आयोजन करण्यात आले आहे. करिता सदर प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

संस्था अध्यक्ष / सचिव

परिशिष्ट-१४

प्राचार्यांच्या कालावधीत मागील तीन वर्षातील विद्यार्थ्यांच्या उत्तीर्णतेचे प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, श्री / श्रीमती / डॉ. ..... हे / ह्या दि..... पासुन ..... या महाविद्यालयामध्ये प्राचार्य म्हणुन कार्यरत आहेत. सदर प्राचार्यांच्या कालावधीत मागील तीन वर्षातील विद्यार्थ्यांच्या उत्तीर्णतेचे प्रमाण हे वर्षनिहाय खालीलप्रमाणे आहे. करिता सदर प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

तक्ता

अ.क्र.	वर्ष	परीक्षेला बसलेले विद्यार्थी		उत्तीर्ण विद्यार्थी संख्या		निकालाची टक्केवारी
		उन्हाळी	हिवाळी	उन्हाळी	हिवाळी	
१.						
२.						
३.						

संस्था अध्यक्ष / सचिव

परिशिष्ट-१५

प्राचार्यांच्या कालावधीत नॅक मुल्यांकन व पुनर्मुल्याकंनबाबतचे प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, श्री / श्रीमती / डॉ. ..... हे / ह्या दि..... पासुन ..... या महाविद्यालयामध्ये प्राचार्य म्हणुन कार्यरत आहेत. सदर प्राचार्यांच्या कालावधीत नॅक मुल्यांकन व पुनर्मुल्यांकन झाले आहे. करिता सदर प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

संस्था अध्यक्ष / सचिव

परिशिष्ट-१६

प्राचार्यांच्या कालावधीत राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अनुषंगाने केलेल्या विशेष कार्यवाहीबाबतचे प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, श्री / श्रीमती / डॉ. ..... हे / ह्या दि..... पासुन ..... या महाविद्यालयामध्ये प्राचार्य म्हणुन कार्यरत आहेत. सदर प्राचार्यांच्या कालावधीत राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अनुषंगाने ..... या प्रकारची विशेष कार्यवाही केली आहे. करिता सदर प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

संस्था अध्यक्ष / सचिव

परिशिष्ट-१७

मागील तीन वर्षातील वर्षनिहाय एपीआय (Academic Research Score) गुण (११०) बाबतचे प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, श्री / श्रीमती / डॉ. ..... हे / ह्या दि..... पासुन ..... या महाविद्यालयामध्ये प्राचार्य म्हणुन कार्यरत आहेत. यांचा मागील तीन वर्षातील वर्षनिहाय एपीआय (Academic Research Score) खालीलप्रमाणे आहे. करिता सदर प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

अ.क्र.	वर्ष	API
१.		
२.		
३.		

संस्था अध्यक्ष / सचिव